# निष्कर्ष

# निष्कर्ष

भारताची फाळणी झाली. हिंदू - मुस्लिम या दोन जमातींमध्ये प्रचंड दरी निर्माण झाली. भारताची फाळणीचे बीजे स्वातंत्र्यलढयामध्येच आढळतात. भारताची फाळणी ही जणू भारताच्या ऱ्हदयाचीच फाळणी होती. या फाळणीने ज्या खोलवर जखमा निर्माण झाल्या त्या अद्यापही भरुन निघाल्या नाहीत. भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांसाठी फाळणी ही दुर्दैवी घटना मानली जाते.

भारताची फाळणी होत असताना तत्कालीन नेत्यांचे विचार काय होते हे निष्कर्ष काढणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत १९१९ ते १९४८ हा कालखंड गांधीयुग म्हणून ओळखला जातो, कारण या कालखंडात काँग्रेसचे सर्वेसर्वा सूत्रधार गांधी होते. गांधीजी हिंदू व मुसलमान ऐक्याचे समर्थक होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात प्रामुख्याने महात्मा गांधींची कामगिरी महत्त्वाची ठरते. भारताला स्वातंत्र्य फाळणीच्या कटु आठवणीने मिळाले. या फाळणीसाठी गांधींना जबाबदार धरता येणार नाही कारण जातीय निकषावर देशाचे तुकडे होऊ नयेत म्हणून गांधींनी अगदी अखेरच्या क्षणापर्यंत फाळणीला विरोध केल्याचे लक्षात येते.

पाकिस्तानची मागणी पुढे येऊ लागल्यावर देशाची फाळणी करण्यापूर्वी माझ्या देहाचे विच्छेदन करा, देशाच्या फाळणीत मी राजेखुषीने सहभागी होऊ शकणार नाही ते टाळण्यासाठी मी सर्व अहिंसक उपाय योजीन असे त्यांनी जाहीर केले. यावरून त्यांचे फाळणीविषयची मत लक्षात येते. महात्मा गांधींनी फाळणी टाळण्याकरिता नऊ कलमी योजना व्हाइसरॉय यांना सादर केली. या योजनेत सरकार बनविण्याचे व चालवण्याचे सर्व अधिकार त्यांनी बॅ. जीना यांना देऊ केले होते. देशाची फाळणी टाळण्याकरिता गांधीजींनी आखलेली योजना अगदी योग्य होती. परंतु ती प्रत्यक्षात उतरु शकली नाही. या योजनेला काँग्रेसने विरोध केला.

काँग्रेसच्या पाठिंब्याने जीनांनी सरकार स्थापन करावे त्यामुळे ब्रिटीशांचा फाळणीचा डाव उधळून टाकता येईल अशी गांधीजींची योजना होती. गांधीजींची ही योजना इंग्रज सरकारला त्याचबरोबर काँग्रेसला मान्य नसल्याचे लक्षात येते. फाळणीसंबंधीच्या ब्रिटीशांच्या तर्कशास्त्रालाच गांधींचा विरोध होता. ब्रिटीशांनी फाळणीची सूचना करावी हे त्यांच्या निराशेचे चिन्ह आहे हे गांधींना वाटत होते, म्हणून आपण व्हाईसरॉयला सादर केलेल्या योजनेच्या आराखडयाचा काँग्रेस नेत्यांनी स्वीकार करावा आणि त्यामुळेच फाळणीचे संकट टळेल असे गांधींचे प्रयत्न होते.

गांधींनी फाळणी टाळण्यासाठी ब्रिटीशांच्या सद्सद्विवेकबुध्दिला आव्हान केले. फाळणीच्या प्रश्नात ब्रिटीशांनी लक्ष घालू नये. फाळणीचा प्रश्न गुंतागुंतीचा आहे त्यात तुम्ही अडकू नये, देशाला स्वातंत्र्य द्या, आम्ही ठरवतो फाळणी करायची की नाही, असे मत गांधीजींनी मांडल्याचे दिसून येते. गांधीजींनी फाळणी टाळण्यासाठी राजाजी योजनेला पाठिंबा दिला. राजाजी योजनाही काँग्रेस व मुस्लिम यांच्या साहचर्य व समन्वय निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आली होती. या योजनेला जीनांनी मान्यता दिली नाही. राजाजी योजनेने देऊ केलेले कुरतडलेले पाकिस्तान त्यांना नको होते. गांधींनी फाळणी टाळण्यासाठी जीनांशी चर्चा केली. दोन्ही देशांना फाळणी कशाप्रकारे घातक आहे हे समजावून सांगण्याचा प्रयत्न गांधींनी जीनांना केला. परंतु जीना हे फाळणीसाठी आग्रही राहिल्याचे दिसून येते.

गांधींनी फाळणी टाळण्यासाठी अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न केल्याचे दिसून येते. परंतु मुस्लीम लीगचा वाढता जातीय द्वेष, जीनांची पाकिस्तान मागणीची आग्रही भूमिका, गांधींना अखेरच्या काळात काँग्रेस नेत्यांनी साथ दिली नाही या सर्व कारणांमुळे गांधींनी फाळणीला मान्यता दिल्याचे दिसून येते. फाळणीच्या विरोधात फक्त गांधीच शेवटपर्यंत उभे राहिल्याचे लक्षात येते.

पंडित नेहरूंचा राजकीय सहभाग गांधींच्या काळात झाला. गांधींच्या नेतृत्त्वाखालील काँग्रेस मध्ये नेहरू सामील झाले. नेहरु हे गांधींचे शिष्य होते.

नेहरुंच्या फाळणीविषयी विचारांचा अभ्यास करता असे लक्षात येते की, त्यांनी फाळणीला विरोध केल्याचे दिसून येते. जमातवादाचा तर नेहरुंना अत्यंत तिटकारा होता. जातीवाद आणि जमातवाद ही अत्यंत संकुचित विचाराची प्रतिके आहेत असे त्यांचे मत होते.

नेहरुंना धर्माबद्दल कमालीची अनास्था होती. जगातील निरनिराळया धर्मांबद्दल ते लिहितात, भारतात आणि अन्यत्र आज ज्यांना धर्म म्हणतात त्याचे कृत्य पाहून मी भयकंपीत होतो. निरनिराळया मानवी समूहाचे ते पूर्वग्रहदूषित दुराग्रह आहेत. मला ज्याचे मुळीच आकर्षण नाही. या सर्व धर्मांची नेहरुंना घृणा वाटत होती.

नेहरु हे कॉंग्रेसचे पुढारी होते. त्यांनी कॉंग्रेस ही मुसलमानांच्या विरोधी नाही. तसेच मुस्लीम लीग या पक्षासारखी जातीवादी नाही हे सांगण्याचा प्रयत्न केला. मुस्लिमांना पाकिस्तान म्हणून स्वतंत्र राष्ट्र निर्माण करणे कसे परवडण्यासारखे नाही हे सांगण्याचासुध्दा प्रयत्न केला. कॉंग्रेस व मुस्लिम लीग या दोन पक्षातील जे गैरसमज आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न नेहरुंनी केला आहे. पाकिस्तान मागणीच्या जीनांच्या भूमिकेचा त्यांनी विरोध केला होता.

नेहरुंनी वारंवार बॅ. जीना यांना कॉंग्रेसचा दृष्टिकोन, धोरणे समजावून सांगून गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला पण जीनांनी याला थंडच प्रतिसाद दिला होता. पंडित नेहरुंच्या मते भारताची फाळणी झाली तर भारतीय स्वातंत्र्यलढयामध्यें ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी हौतात्म्य पत्करले त्यांचा अपमान ठरेल. यावरून असे समजते की, पंडित नेहरुंना फाळणी व्हावी असे मनापासून वाटत नव्हते.

पंडित नेहरुंचे पाकिस्तानसंबंधी विचारामध्ये मुस्लिम लीगच्या जातीयवादी भूमिकेमध्ये फरक पडत गेला. ते मुस्लिम लीगच्या या जातीय दंगली, हिंसाचार घडवून आणण्याच्या कारवाईमुळे त्रस्त झाले होते. नेहरुंना असे वाटत होते की भारतासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. त्याबरोबरच पाकिस्तान निर्मितीचा प्रश्न त्यांना शुष्क किंवा काही लक्ष न देण्यासारखी बाब

वाटत होती. जीना व मुस्लिम लीग यांनी कॅबिनेट मिशनला केलेला विरोध, घटनापरिषदेला केलेला विरोध व हंगामी सरकारात मुस्लीम लीगने केलेली अडवणूक या सर्व कारणांमुळे पंडित नेहरुंनी फाळणीला मान्यता दिल्याचे लक्षात येते. पंडित नेहरुंच्या मते, भारत हा एकसंघ राहावा परंतु त्यामध्ये जातीय दंगे, जाळपोळ अशा घटना होऊ नयेत यासाठी त्यांनी फाळणीस मान्यता दिली. नेहरुंनी स्पष्ट केले आहे की मुस्लिम लीग स्वतंत्र राष्ट्रांच्या मागगीसाठी अडूनच बसणार असेल तर त्यांना स्वतंत्र राष्ट्र देण्यात येईल. फाळणीस नेहरुंनी समर्थता दर्शविली असल्याचे दिसून येते.

नेहरु व सरदार पटेल यांची फाळणीसंबंधी भूमिका महत्त्वाची ठरते. कारण काँग्रेस कार्यकारिणीत हे दोन नेतेच महत्त्वाचे होते. सरदार पटेलांनी वकिली व्यवसाय सोडून गांधींच्या बरोबर राष्ट्रीय आंदोलनात भाग घेतला. १९२८ मध्ये सरदार पटेलांनी बारडोली सत्याग्रहाचे संचालन केले व हा सत्याग्रह यशस्वी घडवून आणला होता. सरदार पटेलांचे व्यक्तिमत्त्व तडफदार, दृढनिश्चय, शिस्तप्रिय असे होते. सरदार पटेलांनी दीर्घकाळ काँग्रेसचे नेतृत्त्व केले होते. महात्मा गांधी व पंडित नेहरु यांच्या पाठोपाठ भारतीय राजकारणात सरदार वल्लभभाई पटेलांनी मोलाची कामगिरी नि:संशय बजावली. सरदार पटेलांनी फाळणीच्या चर्चेत त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला होता. सर्वप्रथम सरदार पटेलांनी फाळणीला मान्यता दिली असा आरोप आहे. परंतु सरदार पटेल यांनी सतत जीनांच्या मागणीला विरोध केला होता.

सरदार पटेलांनी भारताची एकात्मता टिकून राहावी यासाठी प्रयत्न केले. फाळणी ही मूलत: चूक आहे हे ते शेवटपर्यंत विसरु शकले नाहीत. जातीय दंगली रोखण्याचे महत्त्वपूर्ण काम सरदार पटेलांनी बजावले होते. सरदार पटेलांच्या दृष्टिकोनातून मुस्लीम लीग ही धार्मिक संघटना आहे. ही संघटना दहशतीच्या जोरावर भारताची फाळणी करु इच्छित आहे. मुस्लीम लीगला सरदारांचा विरोध होता. वास्तविक सरदार देशाच्या अखंडतेची सदैव कामना करत होते. लोकशाहीच्या रुपात सशक्त भारत निर्माण करु इच्छित

होते आणि या मार्गात जो अडसर येईल त्याला शत्रू समजत होते. सरदार पटेल मुस्लीम लीगकडे देशाच्या एकतेत सहकार्य करणार असेल तर उदारपणे बघत होते. जेव्हा लीगचा जातीयवादी दृष्टिकोन बदलण्याची काही चिन्हे दिसत नव्हती. तेव्हा मात्र सरदार पटेलांची खात्री पटली की लीग देशाचा शत्रू आहे आणि लीग देशाचे विभाजन करु पाहत आहे.

सरदार पटेलांनी मुस्लीम लीग व राष्ट्र स्वयंसेवक संघाला जातीच्या आधारे दहशत निर्माण करण्यास विरोध दर्शविला होता. ब्रिटीशांकडून फाळणी स्वीकारण्यास पटेलांचा जास्त विरोध होता.

सरदार पटेलांनी अखेर फाळणीला मान्यता दिल्याचे दिसून येते. सरदार पटेलांनी फाळणीसाठी निकराचा विरोध केला त्यावेळच्या परिस्थितीचे फाळणी हे अपत्य होते असे सरदारांचे मत होते. तत्कालीन नेत्यांमध्ये कणखर भूमिका घेणारे ते पहिले नेते होते परंतु त्यावेळच्या राजकीय गुंतागुंतीमुळे ते तसा निर्णय घेऊ शकले नाहीत. जीनांशी दोन हात करण्याच्या बाबतीत इतर नेत्यांमध्ये पटेल जास्त समर्थ होते. परंतु दुर्दैवाने या पोलादी पुरुषाला त्यावेळी काहीच करता आले नाही. मुस्लीम लीगच्या राजकारणाला हताश होऊन अखेर सरदार पटेलांनी फाळणीला मान्यता दिल्याचे दिसून येते.

बॅ. महंमद अली जीना यांची फाळणीविषयक विचार निर्णायक ठरतात. बॅ. जीना हे भारतीय विभाजनाचे निमित्तकारण झाले. विभाजनाची बीजे यापूर्वीच रुजलेली होती. कित्येक शतकाच्या विषारी प्रचाराने भडकलेल्या द्वेषाग्नीचे १९४७ मध्ये वणव्यात रुपांतर झाले आणि स्वातंत्र्य प्राप्तीच्या क्षणी फाळणी अपरिहार्य झाली. भारताच्या इतिहासात बॅ. जीनांना फाळणीचे जनक म्हणून संबोधण्यात येऊ लागले.

बॅ. जीना हे प्रारंभी निष्ठावान राष्ट्रवादी होते. आपल्या राष्ट्रवादी निष्ठेला धक्का लागेल असे काहीही करायला ते तयार नव्हते. १९०६ मध्ये मुस्लीम लीगची स्थापना झाली. परंतु जीना यावेळी कॉंग्रेसमध्येच होते. आगाखान यांच्या नेतृत्त्वाखाली मुस्लिमांनी लॉर्ड मिटांला दिलेल्या निवेदनात

स्वतंत्र मतदार संघाची मागणी होती. पण जीनांचा स्वतंत्र मतदारसंघाला विरोध होता. १९१२ मध्ये लीगचे सदस्यत्व स्वीकारताना जीनांनी मुस्लीम हितसंबंधांना अगर लीगविषयक निष्ठेला दुय्यम स्थान दिले. प्रथम राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्रीय हितसंबंध आणि नंतर मुस्लिम हितसंबंध यांना जीनांनी महत्त्व दिले. १९२८ नंतर नेहरु रिपोर्टमधील संयुक्त मतदार संघाच्या स्वीकृतीवरुन मतभेद निर्माण झाले आणि जीना काँग्रेसमधून बाहेर पडले.

जीनांनी नंतर भूमिकाच बदलली. जीना काँग्रेसविरोधी प्रचार करु लागले. मुस्लीम लीगमध्ये ज्यांनी धार्मिकता जोपासण्याचे कार्य केल्याचे दिसून येते. जीना पाकिस्तानच्या मागणीसाठी आग्रही राहिल्याचे दिसून येते. राजाजी योजना त्यांनी नाकारली. आपल्या चौदा मागण्या मान्य होण्यासाठी ते आग्रही झाले. १९३७ च्या निवडणूकीत त्यांनी संघराज्य पध्दतीला विरोध म्हणून व मुस्लिम एकजूट आणि प्रांतिक सरकारात मुसलमानांना योग्य व प्रभावी प्रतिनिधीत्व या मुद्दयांवर निवडणुक लढविली.

१९४० च्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात स्वतंत्र पाकिस्तानचा ठराव पास केला. जीनांनी अध्यक्षीय भाषणात हिंदू व काँग्रेस पक्षाविरोधी प्रचारांची राळ उठवली. येथेच फाळणीची मागणी जीनांनी मांडल्याचे दिसून येते. अखेरीस वाटाघाटीसाठी आलेल्या कॅबिनेट मिशनला त्यांनी प्रथम पाठिंबा दिला. पण जीनांच्या मनातील मनसुबे पूर्ण होऊ शकले नाही म्हणून त्यांनी कॅबिनेट मिशनला विरोध केला. १६ ऑगस्ट हा प्रथम कृतिदिन म्हणून साजरा केला. पाकिस्तान मागणीसाठी जीनांनी यावेळी हट्टवादी भूमिका घेतल्याचे दिसून येते. येथेच जीना हे फाळणीस कारणीभूत असल्याचे स्पष्ट होते.

मौलाना आझाद हे काँग्रेस मधील निष्ठावान मुस्लीम पुढारी होते. भारतीय राजकारणाच्या इतिहासात राष्ट्रीय मुस्लिमांचे प्रमुख प्रवक्ते म्हणून मौलाना अबुल कलाम आझाद यांचेच नाव घ्यावे लागेल. भारतीय इस्लाममध्ये आझाद हे क्रांतीकार धर्मपंडित व तत्त्वचिंतक म्हणून ओळखले जातात. मुस्लीम

समाजाने राष्ट्रीय प्रवाहापासून मुळीच विलग होता कामा नये असा कटाक्षाने त्यांनी वेळोवेळी आग्रह धरला.

आझादांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात धार्मिक नेता म्हणून केली. आपल्या राजकीय जीवनाच्या सुरुवातीला ते कट्टर मुस्लीम राष्ट्रवादी होते. सर सय्यदच्या लिखाणाने प्रभावित होऊन आझादांनी १९०६ च्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात उपस्थित राहून राजकारणात प्रवेश केला. परंतु त्यांच्या बंडखोर मनोवृत्तीमुळे ते सर सय्यदचे अनुयायी होऊ शकले नाहीत. ब्रिटीश सरकारला सातत्याने पाठिंबा देण्याचे सर सय्यदांचे धोरण आझादांना रुचले नाही. ब्रिटीश सत्तेविषयी मुस्लिमांच्या मनात असलेली राजनिष्ठेची भावना काढून टाकण्याचे त्यांनी प्रयत्न केले. १९०२ मध्ये त्यांनी अल हिलाल व १९१६ मध्ये त्यांनी अल बलाग ही दोन साप्ताहिके काढून त्यांनी मुस्लीम समाजात बुध्दिवादी व साहित्यीक वातावरण तयार केलेच पण धर्म व राजकारण याबाबतीत जागृती निर्माण केली.

आझादांनी फाळणी टाळण्यासाठी कॅबिनेट मिशनचा स्वीकार करावा यासाठी आग्रही भूमिका मांडल्याचे दिसून येते. कॅबिनेट मिशन योजना व काँग्रेसची योजना यात साम्य होते म्हणून ती स्वीकारावी असे त्यंचे मत होते. परंतु नेहरूंच्या पत्रकार परिषदेच्या वक्तव्याचा अन्वयार्थ चुकीचा लावल्याने जीनांनी कॅबिनेट मिशनला नकार दिला.

आझादांनी फाळणीसाठी नेहरु व पटेलांना जबाबदार धरले आहे. आझादांच्या मते हे दोन्ही नेत्यांनी शांत डोक्याने विचार केला असता तर फाळणी टळू शकली असती. आझाद हे शेवटपर्यंत फाळणीच्या विरोधात होते. फाळणीसाठी आझाद व गांधींचा विरोध असल्याचे लक्षात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाकिस्तान संबंधी विचार 'पाकिस्तान अर्थात भारताची फाळणी' या पुस्तकात मांडले आहेत. आंबेडकरांनी हिंदू व मुसलमानांच्या कलहाचे मूळ कारग धार्मिक मानले आहे. कडवट धार्मिक प्रेरणांमुळे हिंदुस्तानात, हिंदु - मुस्लिम कलह अटळ आहे असा बाबासाहेबांनी

सिध्दांत मांडला. आंबेडकरांनी फाळणीचा विरोध केला. परंतु फाळणीच्या व्यावहारिक बाजूचा विचारसुध्दा केलेला आहे. फाळणी ही अटळ होती.

वरील नेत्यांच्या फाळणीविषयक भूमिकेचा विचार करता असे निदर्शनास येते की फाळणीसाठी कोणा एका नेत्याला जबाबदार धरता येणार नाही. फाळणी व्हावी हे कुणाला ही मनापासून वाटत नव्हते. देशाचे विभाजन हे सर्वांसाठी दु:खदायक गोष्ट होती. फाळणीसाठी अगदी अनेक शतकातील विषारी प्रचार कारणीभूत ठरला. त्याचप्रमाणे ब्रिटीशांनी हिंदू-मुस्लिम धर्मात द्वेष निर्माण करण्याचे काम केले. हिंदू-मुस्लिम संघर्षामध्ये हिंदू महासभेच्या, हिंदुत्त्वाच्या प्रचाराचा मुद्दा सुध्दा कारणीभूत ठरला. मुस्लीम लीगच्या विभक्त राष्ट्रांच्या मागणीला हिंदुमहासभेच्या या प्रचाराने अधिकच जोर चढल्याचे जाणवते. हिंदू महासभा व मुस्लीम लीग यांच्यामध्ये जातीय संघर्ष फाळणीस कारणीभूत ठरल्याचे जाणवते. फाळणीबाबत हिंदू महासभा व मुस्लीम लीग यांच्या भूमिकेचा विचार केला तर हा संशोधनाचा एक वेगळाचा विषय होऊ शकतो. फाळणीसंदर्भात स्वातंत्र्य लढयामध्ये जे महत्त्वाचे नेते महात्मा गांधी, पंडित नेहरु, सरदार पटेल, बॅ. महंमद अली जीना, मौलाना आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिका महत्त्वाच्या ठरतात.